लोकमत

नसीर अत्तार







कोल्हापुरात सोमवारी शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेचा प्रारंभ झाला. त्यात राजस्थानमधील बनस्थळी विद्यापीठाच्या संघाने देशभक्तीपर कव्वाली सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. दुसऱ्या छायाचित्रात स्पर्धेच्या ठिकाणी सादरीकरण झाल्यानंतर काही संघांनी, विद्यार्थी कलाकारांनी असा 'सेल्फी' टिपला. तिसऱ्या छायाचित्रात कव्वाली स्पर्धेदरम्यान भारतीय विद्यापीठ महासंघाचे (एआययू) सहसचिव डॉ. डेव्हीड सॅम्पसन यांनी कव्वाली सादर केली.

लोकमत

## देशभक्तीचा जागर : उर्दूतील नजाकतीच्या शेरोशायरी, सूर-तालाच्या संगमाला रसिकांची उत्स्फूर्त दाद

# विद्यापीठात राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेस प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** 'चाह ये है के मेरी हर साँस देश के नाम पर मिट जाँए', 'आज गहेरी नींद मे चला है फिर तेरा वतन', अशा कव्वालीतून शिवाजी विद्यापीठात विद्यार्थ्यांनी सोमवारी देशभक्तीचा जागर केला. भारतीय विद्यापीठ महासंघ (एआययू) आणि शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित 'जश्न-ए-कव्वाली' या तिसऱ्या राष्ट्रीय आंतर-विद्यापीठ कव्वाली स्पर्धेस उत्साहात प्रारंभ झाला.

विद्यापीठातील वि. स. खांडेकर सभागृहामध्ये या स्पर्धेचे उद्घाटन 'एआययू'चे सहसचिव डॉ. डेव्हीड सॅम्पसन यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, 'एआययू'चे निरीक्षक डॉ. विश्वरामन निर्मल प्रमुख उपस्थित होते. या 'जश्न-ए-कव्वाली'ची सुरुवात सागर (मध्य प्रदेश)मधील डॉ. हरिसिंह गौर विद्यापीठाच्या संघाने केली. या संघाने 'मेहफिल हमारी एक है, मेहफिल के टुकडे मत करो... मंजिल हमारी एक है, मंजिल के टुकडे मत करो... भारत हमारा एक है, भारत के टुकडे मत करो...' या कव्वालीतून एकात्मतेची साद घातली. राजस्थानच्या बनस्थळी विद्यापीठाच्या संघाने 'चाह ये है के मेरी हर साँस देश के नाम पर मिट जाए' ही कव्वाली सादर केली. शिवाजी विद्यापीठाच्या संघाने 'आज गहेरी नींद मे चला है फिर तेरा वतन' आणि 'मन कुंथो मौला...' ही कव्वाली सादर करून उपस्थितांची मने जिंकली. मुंबई विद्यापीठाच्या संघाने सादर केलेल्या 'ये वतन तेरे खातीर...' 'आज रंग है री...' या कव्वालीने स्पर्धेत रंग भरला. पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या सादरीकरणाने स्पर्धेच्या पहिल्या दिवसाचा समारोप झाला. उर्दूतील नजाकतीच्या शेरोशायरी, सूर-तालाच्या संगमातून सादर झालेल्या कव्वालीने विद्यापीठात एक वेगळे वातावरण निर्माण केले. रसिकांच्या गर्दीने सभागृह खचाखच भरले होते. देशभक्तिपर आणि पारंपरिक या प्रकारांमध्ये कव्वालीचे विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. दरम्यान, उद्घाटनाच्या कार्यक्रमात परीक्षक सईद खान, रियाझ खान, भारती वैशंपायन यांचे डॉ. स्वरुपा पाटील यांनी स्वागत केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी आभार मानले.

### 'कव्वालीमय' वातावरण

- या स्पर्धेच्या निमित्ताने देशभरातील सात संघ दाखल झाले आहेत. या संघांतील विद्यार्थी हे विद्यापीठ परिसरात फेरफटका मारत आहेत.
- विविध ठिकाणी ते छायाचित्रे टिपून घेत आहेत. अशा स्वरुपातील स्पर्धा विद्यापीठात पहिल्यांदाच आयोजित केली आहे; त्यामुळे कव्वाली ऐकण्यास विद्यार्थ्यांची गर्दी होत आहे.
- कव्वालीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये चर्चा रंगत आहेत. स्पर्धेनिमित्त विद्यापीठाच्या मुख्य इमारतीला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

" कव्वाली ही पवित्र हृदयाने ईश्वराला घातलेली साद आहे. कव्वाली हा कलाप्रकार अस्तंगत होऊ लागला आहे, त्याला संजीवनी देण्यासाठी या स्पर्धेचा उपक्रम सुरु करण्यात आला आहे.

**- डॉ. डेव्हीड सॅम्पसन**

" पोवाडा, लावणीची परंपरा असलेल्या कोल्हापुरात कव्वाली स्पर्धेचे आयोजन ही एका सांस्कृतिक बदलाच्या आणि समावेशनाच्या दिशेने आपली वाटचाल होत असल्याचे सुलक्षण आहे.

**- डॉ. देवानंद शिंदे**



" कव्वाली एक वेगळा सांगितीक प्रकार आहे. त्याच्या राष्ट्रीय स्पर्धेतून अन्य संघांच्या सादरीकरणातून नवीन खूप काही शिकायला मिळते.

**-सिद्धी नारकर,** मुंबई विद्यापीठ



" या स्पर्धेत आमचे विद्यापीठ सलग तिसऱ्या वर्षी सहभागी झाले आहे. या स्पर्धेतून कव्वाली प्रकाराला प्रोत्साहन देण्याचा चांगला प्रयत्न होत आहे.

**- कमलजित,** लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी



### समारोप आज

- या स्पर्धेत देशभरातील आठ संघ सहभागी झाले आहेत. त्यातील पाच संघांनी पहिल्या दिवशी सादरीकरण केले.
- आज, मंगळवारी सकाळी ९ ते ११ वाजेपर्यंत स्वामी रामानंदतीर्थ विद्यापीठ नांदेड, संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती आणि महर्षी दयानंद विद्यापीठ रोहतकचे संघ सादरीकरण करणार आहेत. दुपारी चार वाजता बक्षीस वितरणाचा कार्यक्रम होईल.

# कव्वालीमुळे समतेची भावना रुजेल

## डॉ. डेव्हीड सॅम्पसन : विद्यापीठात माहोल 'जश्न-ए-कव्वाली'चा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
संगीत हे क्षेत्र असे आहे की, त्यामध्ये देशाला एका सूत्रात गुंफण्याची क्षमता आहे; पण कव्वालीसारखा एक अतिशय महत्त्वाचा सांगीतिक कलाप्रकार अस्तंगत होऊ लागला आहे, त्याला संजीवनी देण्यासाठी या कव्वाली स्पर्धेचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. कव्वालीमुळे एकतेची, समतेची भावना विद्यार्थ्यांच्या मनात रुजेल, असे मत नवी भारतीय विद्यापीठ महासंघाचे (एआययू) सहसचिव डॉ. डेव्हीड सॅम्पसन यांनी व्यक्त केले.

विद्यापीठात सोमवारपासून तिसऱ्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठ कव्वाली स्पर्धेस प्रारंभ झाला. शिवाजी विद्यापीठ आणि भारतीय विद्यापीठ महासंघ (एआययू) यांच्या संयुक्त विद्यमाने ही दोनदिवसीय स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. तत्पूर्वी, सॅम्पसन यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते, तर




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित तिसऱ्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठ कव्वाली स्पर्धेमध्ये सहभागी झालेला राजस्थान येथील बनस्थळी विद्यापीठाचा संघ.** (छाया : एस. अली)

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि एआययूचे निरीक्षक डॉ. विश्वरामन निर्मल प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, रांगडा पोवाडा आणि लावणीची परंपरा असलेल्या कोल्हापुरात कव्वाली स्पर्धेचे आयोजन ही एका सांस्कृतिक बदलाच्या आणि समावेशनाच्या दिशेने आपली वाटचाल होत असल्याचे सुलक्षण आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा आदर्श समोर ठेवूनच ही स्पर्धा आयोजिली आहे. गतवर्षी शिवाजी विद्यापीठाच्या कव्वाली संघाने राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेचे विजेतेपद मिळविले. त्या विद्यार्थ्यांच्या यशामुळेच शिवाजी विद्यापीठात ही स्पर्धा आयोजित करण्याची प्रेरणा मिळाली.

यावेळी स्पर्धेचे परीक्षक सईद खान (नवी दिल्ली), रियाझ खान (मुंबई) व भारती वैशंपायन (कोल्हापूर) यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी डॉ. स्वरूपा पाटील यांनी स्वागत केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले, तर विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी आभार मानले.

त्यानंतर मध्य प्रदेशातील गौर विद्यापीठाच्या संघाचे सादरीकरण झाले. 'मेहफिल हमारी एक है, मेहफिल के टुकडे मत करो... मंझिल हमारी एक है, मंझिल के टुकडे मत करो... भारत हमारा एक है, भारत के टुकडे मत करो...' अशी प्रत्येक देशबांधवाला आर्त साद घालणारी कव्वाली गौर विद्यापीठाच्या संघाने सादर केली आणि खऱ्या अर्थाने शिवाजी विद्यापीठात 'जश्न-ए-कव्वाली'चा माहोल तयार झाला. त्याच्यानंतर राजस्थान येथील बनस्थळी विद्यापीठाच्या संघाने 'चाह ये है के मेरी हर साँस देश के नाम पर मिट जाए' ही कव्वाली सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

23 OCT 2018

**Times of India**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Good response for All-India Qawwali event at SUK

TIMES NEWS NETWORK

Rahul Gayakwad




Eight teams from across the country are participating in the two-day inter-university competition

**Kolhapur:** The 3rd All-India Inter-University National Qawwali Competition began at the Shivaji University, Kolhapur (SUK) on Monday amid rousing response from the audience.

"The venue of the competition did not have any space left for the audience as it witnessed houseful response for the inaugural event. The event began with performance from the Dr Harisingh Gour University from Sagar in Madhya Pradesh," a media release from SUK said.

Joint secretary of the Association of Indian Universities (AIU) David Sampson inaugurated the event. "Music holds the power to bring the world closer. It can keep human beings young and cheerful. Qawwali is also one of the most powerful types of music and this type of events will prove important for its revival. National unity and tradition should be reflected from the performance is the pre-requisite of the participation, which will help the young minds," he said.

Devanand Shinde, SUK vice-chancellor, said that Kolhapur is creating history by hosting the Qawwali event. "This is the new cultural shift. SUK had won last year's Qawwali competition following which we were inspired to host this competition," he said.

The two-day event will see participation from eight teams across the country. According to varsity officials, all the preparations for the competition have been made and the varsity is all set to host the event.

It should be noted that of the eight participating teams five performed on Monday, while the remaining teams will perform on Tuesday. The award ceremony will also be organised on Tuesday.

23 OCT 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात रंगला कव्वालीचा जश्न...

## कव्वाली महोत्सवाचे एआययूचे सहसचिव डॉ. डेव्हीड सॅम्पसन यांच्या हस्ते उद्घाटन : रसिकांची जिंकली मने

**प्रतिनिधी**
कोल्हापूर




**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात आयोजित तिसऱ्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठ कव्वाली स्पर्धेत कव्वाली सादर करताना विद्यार्थी सोबत सहकारी कलाकार.

कोल्हापुरात सांस्कृतिक वातावरण असले तरी कव्वालीची परंपरा नव्हती. मात्र, आज विद्यापीठातील कव्वाली स्पर्धेच्या माध्यमातून कव्वालीमध्येही 'हम भी किसीसे कम नही' याची प्रचिती शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी दिली. विद्यापीठात दिवसभर कव्वाली जश्न-ए मैफील रंगली.

विद्यापीठातील वि.स. खांडेकर सभागृहात नवी भारतीय विद्यापीठ महासंघाचे (एआययू) सहसचिव डॉ. डेव्हीड सॅम्पसन यांच्या हस्ते कव्वाली स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के, एआययूचे निरीक्षक डॉ. विश्वरामन निर्मल यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली. पाहुण्यांचे कोल्हापुरी फेटे बांधून हलगी-ताशाच्या कडकडाटात मिरवणुकीने स्वागत केले.

'मेहफिल हमारी एक है, मेहफिल के टुकडे मत करो... मंझिल हमारी एक है, मंझिल के टुकडे मत करो... भारत हमारा एक है, भारत के टुकडे मत करो...' अशी आर्त साद घालणारी कव्वाली मध्य प्रदेशमधील सागर येथील डॉ. हरिसिंग गौर विद्यापीठाच्या संघाने सादर केली. मध्य प्रदेशातील गौर विद्यापीठाचा संघ व त्यानंतर राजस्थान येथील बनस्थळी विद्यापीठाच्या संघाने 'चाह ये है के मेरी हर साँस देश के नाम पर मिट जाए' ही कव्वाली सादर करून उपस्थितांची मने जिंकली. फगवाडा (पंजाब) येथील लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी आणि मुंबई विद्यापीठाच्या संघांनी सादरीकरण केले. स्पर्धेचे परीक्षक सईद खान (नवी दिल्ली), रियाझ खान (मुंबई) व भारती वैशंपायन (कोल्हापूर) यांच्यासह पाहुण्यांचे स्वागत डॉ. स्वरूपा पाटील यांनी केले.

**शिवाजी विद्यापीठाच्या संघाने रसिकांची मने जिंकली**

शिवाजी विद्यापीठ हे गत वर्षीच्या कव्वाली स्पर्धेचे विजेते असल्याने या विद्यापीठाच्या सादरीकरणाकडे रसिकांचे लक्ष लागून राहिले होते. शिवाजी विद्यापीठ संघाने 'आज गहरी नींद में चला है, फिर तेरा वतन, तोड दे बेडियाँ, जो बाँधे हैं तेरे कदम' आणि 'मन तुम तो मौला है' या दोन कव्वाली सादर केल्या.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. आर.व्ही. गुरव यांनी आभार मानले. यावेळी उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव राठोड, प्राचार्य डॉ. युवराज गोंडे (वाघोली, सातारा), प्राचार्य डॉ. एम. एल. होनगेकर (आजरा), प्रा.टी. पी. शिंदे, प्राचार्य विजया चव्हाण उपस्थित होते.

पुढारी

# भारत हमारा एक है, टुकडे मत करो...

## 'जश्न-ए-कव्वाली'चा माहोल; राष्ट्रीय आंतर-विद्यापीठ कव्वाली स्पर्धेस प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

'मेहफिल हमारी एक है, मेहफिल के टुकडे मत करो... मंझिल हमारी एक है, मंझिल के टुकडे मत करो... भारत हमारा एक है, भारत के टुकडे मत करो...' अशी देशभरातून आलेल्या विद्यार्थी कलाकरांनी कव्वालीतून देशबांधवांना साद घातली. राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेमुळे शिवाजी विद्यापीठात 'जश्न-ए-कव्वाली'चा माहोल तयार झाला आहे.

तिसऱ्या राष्ट्रीय आंतर-विद्यापीठ कव्वाली स्पर्धेस सोमवारपासून प्रारंभ झाला. शिवाजी विद्यापीठ व भारतीय विद्यापीठ महासंघ (एआययू) यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय स्पर्धा आयोजित केली आहे. सकाळी भारतीय विद्यापीठ महासंघाचे (एआययू) सहसचिव डॉ. डेव्हीड सॅम्पसन यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

मुख्य प्रशासकीय इमारतीपासून कार्यक्रम स्थळापर्यंत हलगी-ताशाच्या कडकडाटात मिरवणूक काढून पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, एआययूचे निरीक्षक डॉ. विश्वरामन निर्मल यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. सॅम्पसन म्हणाले, कव्वालीसारखा सांगितिक कलाप्रकारास संजीवनी देण्यासाठी कव्वाली स्पर्धेचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. राष्ट्रीय एकात्मता व परंपरा यांचा संगम स्पर्धेच्या निमित्ताने होणार आहे. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, रांगड्या पोवाडा आणि लावणीची परंपरा असलेल्या कोल्हापुरात कव्वाली स्पर्धेचे आयोजन ही एका सांस्कृतिक बदल व समावेशनाच्या दिशेने वाटचाल होत असल्याचे सुलक्षण आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा आदर्श समोर ठेवूनच ही स्पर्धा आयोजित केली आहे.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आयोजित तिसऱ्या आंतर-विद्यापीठ स्पर्धेत कव्वाली सादर करताना राजस्थान येथील बनस्थळी विद्यापीठाचा संघ.** (छाया : पप्पू अत्तार)

### शिवाजी विद्यापीठाच्या संघाने जिंकली रसिकांची मने

*शिवाजी विद्यापीठ हे गत वर्षीच्या कव्वाली स्पर्धेचे विजेते असल्याने विद्यापीठ कलाकारांच्या सादरीकरणाकडे रसिकांचे लक्ष लागून राहिले होते. पहिल्या दिवशीच्या दुसऱ्या सत्रात विद्यापीठ संघाने उत्कृष्ट सादरीकरण करीत रसिकांची मने जिंकली. संघाने 'आज गहरी नींद में चला है, फिर तेरा वतन, तोड दे बेडियाँ, जो बाँधे हैं तेरे कदम' आणि 'मन तुम तो मौला है' कव्वाली सादर केल्या. या दोन्ही कव्वालींना रसिकांनी टाळ्यांच्या गजरात प्रतिसाद दिला. त्यानंतर फगवाडा (पंजाब) येथील लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी व मुंबई विद्यापीठाच्या संघांनी सादरीकरण केले.*

### रसिकांचा प्रतिसाद

*कव्वालीला कोल्हापुरात प्रेक्षक नाही, अशी भावना एकीकडे असताना विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर सभागृहात या कव्वाली स्पर्धेला रसिकांचा इतका प्रतिसाद लाभला की, दुपारपर्यंत सभागृहात उभे राहण्यास जागा नव्हती.*

कव्वाली स्पर्धेत मध्य प्रदेशच्या डॉ. सर हरिसिंग गौर केंद्रीय विश्वविद्यालयाच्या संघाने सादरीकरण केले. त्यांनी देशभक्तीपर सादर केलेल्या कव्वालीस उपस्थितांनी टाळ्यांची दाद दिली.

राजस्थानच्या बनस्थळी विद्यापीठाच्या संघाने 'चाह ये है के मेरी हर साँस देश के नाम पर मिट जाए' ही कव्वाली सादर करून उपस्थितांची मने जिंकली. दिवसभरात पाच संघांनी कव्वाली सादर केल्या. मंगळवारी स्पर्धेचा समारोप होणार आहे. डॉ. स्वरूपा पाटील यांनी स्वागत केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. आर. व्ही. गुरव यांनी आभार मानले.

सकाळ

# भारत हमारा एक, टुकडे मत करो...

## विद्यापीठात 'जश्न ए कव्वाली'चा माहौल; आंतर विद्यापीठ कव्वाली स्पर्धा सुरू

**कोल्हापूर, ता. २२ :** 'मेहफिल हमारी एक है, मेहफिल के टुकडे मत करो... मंझिल हमारी एक है, मंझिल के टुकडे मत करो... भारत हमारा एक है, भारत के टुकडे मत करो', प्रत्येक देश बांधवाला आर्त साद घालणारी ही कव्वाली आणि उपस्थितांच्या काळजाला भिडलेला प्रत्येक शब्द न शब्द, देशाचे अखंडत्व टिकण्यासाठी चढलेला सुरांचा साज व त्याला मिळालेली रसिकांची दाद, असा अनोखा 'जश्न ए कव्वाली'चा माहौल विद्यापीठाने आज अनुभवला.

शिवाजी विद्यापीठ व भारतीय विद्यापीठ महासंघ (एआययू) यांच्यातर्फे दोनदिवसीय राष्ट्रीय आंतर विद्यापीठ कव्वाली स्पर्धेस आज सुरवात झाली. नवी भारतीय विद्यापीठ महासंघाचे (एआययू) सहसचिव डॉ. डेव्हिड सॅम्पसन यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. वि. स. खांडेकर सभागृहात आयोजन केले.

डॉ. सॅम्पसन म्हणाले, ''संगीत क्षेत्रात देशाला एका सूत्रात गुंफण्याची क्षमता आहे. कव्वाली पवित्र हृदयाने ईश्वराला घातलेली साद आहे. कव्वालीसारखा अतिशय महत्त्वाचा सांगीतिक कलाप्रकार अस्तंगत होत आहे. त्याला संजीवनी देण्यासाठी कव्वाली स्पर्धेचा उपक्रम सुरू केला आहे. राष्ट्रीय एकात्मता आणि परंपरा यांचा संगम या माध्यमातून व्हावा, म्हणून एक कव्वाली राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक सौहार्दाचे आवाहन करणारी असावी, अशी अट स्पर्धेसाठी घातली आहे.''




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित तिसऱ्या राष्ट्रीय आंतर विद्यापीठ कव्वाली स्पर्धेत सोमवारी कव्वाली सादर करताना सागर (मध्य प्रदेश) येथील डॉ. हरिसिंग गौर विद्यापीठाचे विद्यार्थी-विद्यार्थिनी.**

डॉ. शिंदे म्हणाले, ''पोवाडा व लावणीची परंपरा असलेल्या कोल्हापुरात कव्वाली स्पर्धेचे आयोजन ही एका सांस्कृतिक बदलाच्या आणि समावेशनाच्या दिशेची वाटचाल आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा आदर्श समोर ठेवूनच ही स्पर्धा आयोजिली आहे. गतवर्षी शिवाजी विद्यापीठाच्या कव्वाली संघाने राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेचे विजेतेपद मिळविले. त्यामुळेच ही स्पर्धा आयोजित करण्याची प्रेरणा मिळाली.'' याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि एआययूचे निरीक्षक डॉ. विश्वरामन निर्मल प्रमुख उपस्थित होते. परीक्षक सईद खान (नवी दिल्ली), रियाझ खान (मुंबई) व भारती वैशंपायन (कोल्हापूर) यांचे स्वागत झाले. डॉ. स्वरूपा पाटील यांनी स्वागत केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी आभार मानले.

**आठ विद्यापीठांचा सहभाग**

दरम्यान, दिवसभरात मध्य प्रदेशातल्या सागर येथील डॉ. हरिसिंह गौर, बनस्थळी (राजस्थान), लव्हली प्रोफेशनल (फगवाडा, पंजाब), मुंबई व शिवाजी विद्यापीठाने कव्वालींचे सादरीकरण केले. स्पर्धेत आठ विद्यापीठांनी सहभाग घेतला आहे.

### कव्वालीने मने जिंकली

**शिवाजी विद्यापीठ गतवर्षीच्या कव्वाली स्पर्धेचे विजेते असल्याने या विद्यापीठाच्या सादरीकरणाकडे रसिकांचे लक्ष लागून राहिले होते. शिवाजी विद्यापीठ संघाने 'आज गहरी नींद में चला है, फिर तेरा वतन, तोड दे बेडियाँ, जो बाँधे हैं तेरे कदम', 'मन तुम तो मौला है' कव्वाली सादर करत रसिकांची मने जिंकली.**

# भारत हमारा एक है, टुकडे ना करो

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'पंजाब से आसाम तक, कश्मीरसे मद्रास तक, यह सारा घर हमारा है, इस घर के टुकडे ना करो, भारत हमारा एक है, भारत के टुकडे ना करो', अशी राष्ट्रीय एकात्मतेची साद घालणाऱ्या, तरुणाईत देशभक्तीचे स्फुल्लिंग चेतविणाऱ्या कव्वालीने शिवाजी विद्यापीठातील माहोल भारावला. दिवसभरात विविध राज्यांतील पाच विद्यापीठांच्या विद्यार्थी कलाकारांनी एकापेक्षा एक परफॉर्मन्स केल्यामुळे कॅम्पसमध्ये 'जश्न ए कव्वाली'ची अनुभूती आली.

भारतीय विद्यापीठ महासंघ आणि शिवाजी विद्यापीठातर्फे दोन दिवसीय तिसऱ्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठ कव्वाली स्पर्धेला सोमवारी दिमाखात सुरुवात झाली. स्पर्धेच्या माध्यमातून कव्वाली संघांनी ज्या त्या प्रांतातील वेशभूषा सादर करत आणि राष्ट्रीय एकतेची साद घालत कव्वाली संघांनी सौहार्दाचे दर्शन घडविले.

विद्यापीठातील वि.स.खांडेकर भाषा भवन सभागृहात भारतीय विद्यापीठ महासंघाचे सहसचिव डॉ. डेव्हीड सॅम्पसन यांच्या हस्ते आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन समारंभ झाला. प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, एआययूचे निरीक्षक डॉ. विश्वरामन निर्मल यांची उपस्थिती होती. सईद खान (नवी दिल्ली), रियाज खान (मुंबई) आणि भारती वैशंपायन (कोल्हापूर) परीक्षक आहेत. डॉ. स्वरुपा पाटील यांनी स्वागत केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही.गुरव यांनी आभार मानले.



आंतरविद्यापीठ कव्वाली स्पर्धेत मध्यप्रदेशातील सागर येथील डॉक्टर हरिसिंग गौर केंद्रीय विद्यापीठाच्या कव्वाली संघाने बहारदार सादरीकरण केले.

## विद्यापीठात 'जश्न ए कव्वाली'ची अनुभूती

# युवा महोत्सवाचा जल्लोष २६ पासून

**सचिन लोंढे,**
सीसीआर, शिवाजी विद्यापीठ

प्राध्यापकांच्या संपामुळे रखडलेला शिवाजी विद्यापीठाचा युवा महोत्सव २६ ऑक्टोबरपासून कोरेगाव येथील डी. पी. भोसले कॉलेज आणि २७ रोजी महावीर महाविद्यालयात होणार आहे. तर मध्यवर्ती युवा महोत्सव ३१ ऑक्टोबर रोजी सांगलीच्या विलिंग्डन कॉलेज येथे होणार आहे.

युवा महोत्सव म्हटलं, की डोळ्यासमोर येतो तो गजबजलेला रंगमंच. त्यावरून आपल्यामधील विविध कलागुणांना वाव देणारे महाविद्यालयीन विद्यार्थी, यातून घडणारे नवे कलाकार आणि एकंदरीतच या महोत्सवामध्ये पहायला मिळणारे चैतन्याचे आणि उत्साहाचे वातावरण. शिवाजी विद्यापीठसुद्धा दरवर्षी आपल्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी युवा महोत्सवाचे यशस्वी आयोजन करत असते. मात्र या वर्षीच्या युवा महोत्सवामध्ये प्राध्यापकांच्या संपामुळे युवा महोत्सव स्थगित केला होता. मात्र, हा महोत्सव २६ ऑक्टोबरपासून होणार असल्याने युवा कलाकारांच्या उत्साहाला उधान आले आहे.

## युवा महोत्सवाचे वेळापत्रक

- २६ ऑक्टोबर : डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव, सातारा
- २७ ऑक्टोबर ; महावीर महाविद्यालय, कोल्हापूर
- मध्यवर्ती युवा महोत्सव
- ३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर : विलिंग्डन कॉलेज, सांगली
- इंद्रधनुष्य व पश्चिम महाराष्ट्र युवा महोत्सव संघ निवड शिबिर
- ३ व ४ नोव्हेंबर : वि. स. खांडेकर भाषा भवन, शिवाजी विद्यापीठ
- इंद्रधनुष्य व पश्चिम महाराष्ट्र युवा महोत्सव सराव शिबिर
- १२ नोव्हेंबर : वि. स. खांडेकर भाषा भवन, शिवाजी विद्यापीठ

प्रातिनिधीक फोटो



## शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती युवा महोत्सव सांगलीत

गेली दोन महिने युवा महोत्सवाचे आयोजन हे विविध पातळीवर रखडले होते. एकीकडे प्राध्यापकांचा कडक संप व दुसरीकडे या संपामुळे आयोजक महाविद्यालयाने युवा महोत्सव आयोजनासाठी दाखवलेली असमर्थता यांमुळे युवा महोत्सव कात्रीत सापडला होता. यावर उपाय म्हणून विद्यापीठ प्रशासनाने महोत्सवाचे आयोजन नवीन तारखेस म्हणजेच दोन ऑक्टोबर रोजी करण्याचे ठरवले. मात्र ही तारीख सुद्धा संपामुळे मागे पडली. यानंतर मात्र युवा महोतसव यावर्षी नक्की होणार का ? हाच खरा प्रश्न विद्यार्थ्यांसमोर होता. विद्यार्थ्यांच्या कष्टावर, तयारीवर पाणी फिरणार असेच वाटत होते. मात्र यानंतर प्राध्यापकांचा संप मिटला, तसे विद्यापीठ प्रशासनाने आपल्या हालचालींचा वेग वाढवत सत्र परीक्षांअगोदर म्हणजे २६ ऑक्टोबरपासून युवा महोत्सव घेण्याचा निर्णय घेतला. यामध्ये सांघिक व वैयक्तिक एकूण १४ प्रकारांमध्ये आतापर्यंत सुमारे ५५ महाविद्यालये सहभाग नोंदविला आहे. २६ ऑक्टोबर ते १२ नोव्हेंबर पर्यंत महोत्सवाची धामधूम सुरू राहणार आहे.

# महिला सबलीकरण कार्यशाळा गुरुवारी

कोल्हापूर : राज्य महिला आयोग, राजर्षी शाहू ज्येष्ठ नागरिक सेवा संघ आणि शिवाजी विद्यापीठातील बँक ऑफ इंडिया अध्यासनातर्फे महिला सबलीकरण व सक्षमीकरण कार्यशाळा गुरुवारी (दि. २५) होणार आहे. विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात सकाळी दहा वाजता कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 OCT 2018
तरुण भारत

# 'साहित्याच्या अभ्यासाला तंत्रज्ञानाची जोड हवी'

**कोल्हापूर :** भाषा व साहित्याच्या अभ्यासासाठी पारंपारिक अभ्यास पद्धतीबरोबरच नव्या शैक्षणिक तंत्रज्ञानाची जोड देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. ए. एम. सरवदे यांनी केले. राजाराम महाविद्यालयातील इंग्रजी वाङमय मंडळाच्या उद्‌घाटनाप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. एच. एन. कठरे होते. ते म्हणाले, तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे शैक्षणिक क्षेत्रामध्ये नवनवीन अध्ययन व अध्यापन पद्धती विकसित होत आहे. शिक्षकांनी त्याचा योग्य उपयोग केल्यास भाषा व साहित्याचा अभ्यास करणे सुलभ आणि प्रभावी होऊ शकते. यावेळी ई वॉलपेपर, डिजडीटल वीक, गुगल क्लासरूम अशा उपक्रमांचेही आयोजन करण्यात आले. विभाग प्रमुख डॉ. कडाकणे यांनी प्रास्ताविक तर कल्याणी साठे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. एस. व्ही. रोडे, डॉ. व्ही. के. बीटे. व्ही. एस. आडत, डॉ. एम. ए. काळे आदी उपस्थित होते.

पुढारी

# आज आंतरविभागीय कुस्ती स्पर्धा

**गडहिंग्लज (प्रतिनिधी) :** येथे शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेचे शिवराज महाविद्यालयात आयोजन केले आहे. कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यांतील मुला-मुलींचे संघ सहभागी होणार आहेत. मंगळवारी (दि. २३) मुलींची, शुक्रवारी (दि. २६) मुलांची कुस्ती स्पर्धा होईल. 'शिवराज'चे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन होणार आहे. संचालक ॲड. दिग्विजय कुराडे, अण्णासाहेब पाटील, शंभुराजे देसाई यांची प्रमुख उपस्थिती आहे.

पुढारी

# डी. डी. शिंदे महाविद्यालयात डॉ. सिमिनी बावडेकर यांचे व्याख्यान

**कोल्हापूर (प्रतिनिधी)** :डी. डी. शिंदे सरकार महाविद्यालयात 'आरोग्यविषयक समस्या व अनियमित पाळीसंदर्भात होणारे आजार' या विषयावर डॉ. सिमिनी बावडेकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्राचार्य डॉ. पी. आर. शेवाळे, संस्था अध्यक्ष चारुदत्त शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. बावडेकर म्हणाल्या, पाळीच्या दिवसांत हिंग कोमट पाण्यात घालून प्यावे, आंघोळीच्या वेळी गरम पाण्याने पोटाला शेक द्यावा, आहारात दालचिनी, ओवा, हळद, कडीपत्ता याचा अधिक वापर करावा. तसेच सूर्यनमस्कार, योगातील भ्रामरी, अनुलोम विलोम यासारखे व्यायाम केल्यास स्वास्थ्य मिळते, असा सल्लाही त्यांनी दिला. यावेळी प्रा. स्वाती तोरस्कर यासह विद्यार्थिनी उपस्थित होत्या.